# महाविद्यालय विकास समिती सभा

आज सोमवार दि. ३० आक्टोबर २०२३ ला दुपारी १२.०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा एस.एस. एन. जे. महाविद्यालय, देवळी येथे आयोजित करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री समीर सुरेशराव देशमुख, अध्यक्ष यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा हे उपस्थित होते.

सभेला खालील सभासद उपस्थित होते.

१) श्री. समीर सुरेशराव देशमुख - संस्थाध्यक्ष

२) श्री. सतीशराव के. राऊत - व्यवस्थापन प्रतिनिधी

३) श्री. प्रकाशराव ज. ढांगे - शिक्षणतज्ञ

४) श्री. शशांकराव ग. घोडमारे - उद्योग

५) श्री. मा. प्रा. सुरेशराव बा. देशमुख - संशोधन

६) श्री. टी. एम. मॅन्युअल - IQAC समन्वयक

७) श्री. प्रा. धनराज के. मुंगल - शिक्षक प्रतिनिधी

८) श्री. प्रा. संतोष दे. मोहदरे - विभाग प्रमुख

९) डॉ. सुषमा र. कांबळे - शिक्षक प्रतिनिधी (महिला)

१०) श्री. योगेश ह. नाखले - शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी

११) कु. संतोषी वि. नरड - विद्यार्थी प्रतिनिधी

१२) श्री. डॉ. प्रभाकर पुं. ढाले - प्रभारी प्राचार्य

सभेत खालील विषयावर चर्चा होऊन पुढील

विषय क्र. १ मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
ठराव क्र. १ प्रभारी प्राचार्य ढाले यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. ते सर्वानुमते कायम करण्यात आले.

विषय क्र. २ आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या अंकेक्षित जमाखर्चास मान्यता प्रदान करणे.
ठराव क्र. २ प्रभारी प्राचार्य यांनी आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता अनुदानित तथा विना-अनुदानित अभ्यासक्रमाचे अंकेक्षित जमाखर्चाचे विवरण सभेपुढे सादर केले. त्यावर चर्चा होउन ते नियमाला अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे. असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

विषय क्र. ३ मा. सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर विभाग, नागपूर यांचे नाहरकत पत्रानुसार वरिष्ठ लिपीकाचे रिक्त असलेले पद पदोन्नतीने भरण्यास मंजूरी प्रदान करणे.
ठराव क्र. ३ मा. सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर विभाग नागपूर यांचे नाहरकत पत्रानुसार वरिष्ठ लिपीकाचे रिक्त असलेल्या पदाकरीता आधार कोणता ? रिक्त असलेल्या पदाला पदोन्नती देता येते का ? नियमावली काय आहे ? पद रिक्त कसे झाले. या संदर्भात टीपण तयार करणे व जी. आर (सर्क्युलर) जोडणे असे सर्वानुमते सभेत ठरविण्यात आले.

विषय क्र. ४ श्री. वाय. एच. नाखले, कनिष्ठ लिपीक यांना २३/०५/२०२२ रोजी १२ वर्ष पूर्ण झाल्यानुळे त्यांना २४/०५/२०२२ पासून पहिली आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत चर्चा करणे.
ठराव क्र. ४ श्री. वाय. एच. नाखले यांना २४/०५/२०२२ पासून पहिली आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देण्यासाठी श्री. नाखले यांचा पाच वर्षिय गोपनिय अहवाल तयार करणे. नियुक्ती पासून तर आज पर्यंतचा चार्ट तयार करणे. व पुढील

सभेमधे ठेवणे असे सभेत सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ५ सहायक प्राध्यापक टी. एम. मॅन्युअल हे दिनांक ३१/०५/२०२४ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्यामुळे त्यांच्या अर्जावर चर्चा करणे.

ठराव क्र. ५ श्री. टी. एम. मॅन्युअल इंग्रजी विषयाचे प्राध्यापक हे दिनांक ३१/०५/२०२४ ला नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या संदर्भात सर्व अटी व नियमाला धरून तसेच शासनाच्या अधिन राहून मंजूरी प्रदान करण्यात आली. श्री. मॅन्युअल यांचा सेवानिवृत्तीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा. असे सभेत सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ६ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या रजांना मंजूरी देणे.

ठराव क्र. ६ प्रा. टी. एम. मॅन्युअल, डॉ. पी. पी. ढाले, प्रा. डी. के. मुंगल डॉ. आर. बी. शेख, प्रा. एस. डी. मोहदरे, ग्रंथपाल डॉ. एस. आर. कांबळे श्री. यु. व्ही. चौधरी, श्री. कोठे, श्री. एम. पी. देशमुख, श्री. ए. डी. सातपुते, श्री. मडावी, श्री. आर. के. कांबळे, श्री. वाय. एच. नाखले श्री. एन. के. रोका या कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजांना सेवा-पुस्तिकेतील नोंदीनुसार सभेत सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

विषय क्र. ७ मा. अध्यक्षांच्या अनुमतीने वेळेवर येणारे विषय.

ठराव क्र. ७ माननिय अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या विषयामध्ये २०२२-२३ या सत्रामध्ये सुरू केलेले बी. एससी. या नवीन अभ्यासक्रमाच्या सर्व विषयाच्या फिजिक्स, केमेस्ट्री व बॉटनी या विषयाच्या प्रयोगशाळा तयार करण्यासाठी विविध तीन कोटेशन मार्गाविने व सभेपुढे ठेवणे. बी. एससी. चे नियमित वर्ग सुरू करणे त्याकरीता मानधन तत्वावर विषय शिक्षकाची व लॅब अटेंडन्सची नियुक्ती करणे

वरिष्ठ महाविद्यालयाचे अनुदानित व विना-अनुदानित अभ्यासक्रमाचे सर्व अकाउंट स्टेटमेंट मागविणे. खर्च झालेल्या बीलाचे व्हाउचर फाईल, कॅशबुक व बँक पासबुक प्रिंट पुढील सभेमध्ये ठेवणे असे सर्वानुमते सभेत ठरविण्यात आले.

शेवटी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य यांनी सभेला उपस्थित असलेल्या सर्व सभासदाचे आभार व्यक्त केले; आणि मा. अध्यक्षांच्या अनुमतीने सभा संपली.

President,
Yeshwant Rural Education
Society, WARDHA.

प्राचार्य
Offg. Principal
S.S.N.J. Mahavidyalaya
DEOLI, Dist. Wardha

# • महाविद्यालय विकास समिती सभा •

आज शनिवार दि. २४ फेब्रुवारी २०२४ ला दुपारी १२.०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा एस. एस. एन. जे. महाविद्यालय, देवळी येथे आयोजित करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी मा० समीर सुरेशराव देशमुख, अध्यक्ष यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा हे उपस्थित होते.

सभेला खालील सभासद उपस्थित होते.

१) श्री. समीर सुरेशराव देशमुख - संस्थाध्यक्ष

२) श्री. सतीशराव के. राउत - व्यवस्थापक प्रतिनिधी

३) श्री. प्रकाशराव ज. ढांगे - शिक्षण तज्ञ

४) श्री. शशांकराव शं. घोडमारे - उद्योग

५) श्री. मा. प्रा. सुरेशराव बा. देशमुख - संशोधन

६) श्री. प्रा. संतोष दे. मोहदरे - IQAC समन्वयक

७) श्री. प्रा. धनराज के. सुंगल - शिक्षक प्रतिनिधी

८) डॉ. सुषमा रं. कांबळे - शिक्षक प्रतिनिधी (महिला)

९) कु. संतोषी वि. नरड - विद्यार्थी प्रतिनिधी

१०) श्री. योगेश ह. नारवले - शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी

११) श्री. डॉ. प्रभाकर पुं. ढाले - प्रभारी प्राचार्य

सभेत खालील विषयावर चर्चा होऊन पुढील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आले.

विषय क्र. १ मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
ठराव क्र. १ प्रभारी प्राचार्य ढाले यांनी मागील सभेचे

इतिवृत्त वाचून दाखविले. ते सर्वानुमते कायम करण्यात आले.

विषय क्र. २ मा० सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर विभाग, नागपूर यांचे ना-हरकत पत्रानुसार वरिष्ठ लिपिकाचे रिक्त असलेले पद पदोन्नतीने भरण्यास मंजूरी प्रदान करणे (सोबत जोडलेल्या सेवाजेष्ठता यादीनुसार)

ठराव क्र. २ महाविद्यालयातील कार्यालयीन वरिष्ठ लिपिकाचे रिक्तपद सेवाजेष्ठता यादीनुसार पदोन्नतीने भरण्याबाबत मानिय सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर विभाग, नागपूर यांचे ना-हरकत पत्र क्र. उशि नाग/ कार्या-वर्धा/ पदोन्नती/ना.ह. प्र. ५५२४/२०२३ दि. ५ सप्टेंबर २०२३ नुसार सेवाजेष्ठता यादीनुसार कनिष्ठ लिपिक श्री. संजय देविदास कोठे यांना कार्यालयीन वरिष्ठ लिपिक या पदावर पदोन्नती देण्यात यावी असे सभेत सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ३ श्री. वाय. एच. नाखले कनिष्ठ लिपिक यांना २३/०५/२२ रोजी १२ वर्ष पूर्ण झाल्यामुळे त्यांना २४/०५/२०२२ पासून पहिली आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत चर्चा करणे.

ठराव क्र. ३ श्री. वाय. एच. नाखले यांची कनिष्ठ लिपिक पदावरील सेवेची १२ वर्ष दि. २४/०५/२०२२ रोजी पूर्ण होत असल्यामुळे (दि. २४/०५/२०१० ते २३/०५/२२) शासन निर्णय क्र. एन.जी.जी. १७९४/१८०११/२९७६ वि.शि. ०४ दि. १८.१०.१९९७ जोडलेल्या स्पष्टीकरणा-नुसार तसेच शासन निर्णय दि. २३-०३-१९९८ नुसार ते पहिली आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरत असल्यामुळे त्यांना २४/०५/२०२२ पासून या योजनेचा लाभ देण्याचे सभेत सर्वानुमते ठरविण्यात आले.

विषय क्र. ४ श्री. यु. व्ही. चौधरी अधिक्षक हे दिनांक ३०/०९/२०२४ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्यामुळे त्यांच्या अर्जावर चर्चा करणे.

ठराव क्र. ४ कार्यालय अधिक्षक श्री. यु. व्ही. चौधरी हे आपल्या वयोमर्यादेची विहित अट पूर्ण करून दिनांक

30/09/2024 ला सेवानिवृत्त होत असल्यामुळे त्यांचे सेवानिवृत्तीचे प्रस्ताव तयार करुन शासनाकडे सादर करणे व रिक्तपद भरण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे सभेत सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ५ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या रजांना मंजूरी देणे.

ठराव क्र. ५ श्री. डी. एम मॅन्युआल, श्री. पी. पी. ढाले, श्री. आर. बी. शेख, श्री. यु. व्ही चौधरी, श्री. एस. डी. कोठे, श्री. डब्ल्यू. बी. मडावी, श्री. आर. के. कांबळे, श्री. एम. के. रेका यांनी उपभोगलेल्या अर्जित रजांना त्यांच्या सेवापुस्तकातील नोंदीनुसार सभेत सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

विषय क्र. ६ दि. १.०४.२०२३ ते ३१.१२.२०२३ पर्यंतच्या जमाखर्चास मान्यता प्रदान करणे.

ठराव क्र. ६ प्रभारी प्राचार्य ढाले यांनी दि. १ एप्रील २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ च्या जमाखर्चाचे विवरण सभेत सादर केले. त्यावर चर्चा होऊन ते नियमाला आधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे. असे सभेत सर्वानुमते ठरविण्यात आले.

विषय क्र. ७ मा. अध्यक्षांच्या अनुमतीने वेळेवर येणारे विषय.

ठराव क्र. ७. मा. अध्यक्षांच्या अनुमतीने वेळेवर कोणताही विषय आला नाही. त्यामुळे शेवटी प्रभारी प्राचार्य यांनी उपस्थित सर्व सभासदाचे आभार मानले. व माननिय अध्यक्षांच्या अनुमतीने सभा संपली.

President,
Yeshwant Rural Education
Society, WARDHA.

[signature]
Offg. Principal
S.S.N.J. Mahavidyalaya
DEOLI, Dist. Wardha

## • महाविद्यालय विकास समिती सभा •

आज मंगळवार दि. २६ मार्च २०२४ ला दुपारी १२.०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा एस. एस. एन. जे. महाविद्यालय, देवळी येथे आयोजित करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी मा. समीर सुरेशराव देशमुख, अध्यक्ष यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा हे उपस्थित होते.

सभेला खालील सभासद उपस्थित होते.

१) श्री. समीर सुरेशराव देशमुख - संस्थाध्यक्ष

२) श्री. सतीशराव के. राउत - व्यवस्थापन प्रतिनिधी

३) श्री. प्रकाशराव ज. ढोंगे - शिक्षणतज्ञ

४) श्री. शशांकराव शं. घोडमारे - उद्योग

५) श्री. मा. प्रा. सुरेशराव बा. देशमुख - संशोधन

६) श्री. टी. एम. मॅन्युअल - IQAC समन्वयक

७) श्री. प्रा. धनराज के. मुंगल - शिक्षक प्रतिनिधी

८) श्री. प्रा. संतोष दे. मोहदरे - विभाग प्रमुख

९) डॉ. सुषमा रं. कांबळे - शिक्षक प्रतिनिधी (महिला)

१०) श्री. योगेश ह. नाखले - शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी

११) कु. संतोषी वि. नरड - विद्यार्थी प्रतिनिधी

१२) श्री. डॉ. प्रभाकर पुं. ढाले - प्रभारी प्राचार्य

सभेत खालील विषयावर चर्चा होऊन पुढील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आले.

विषय क्र.-१ मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे
ठराव क्र.-१ प्रभारी प्राचार्य ढाले यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. त्यावर चर्चा होऊन ते सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

विषय क्र. २ IQAC समन्वयक प्रा. टी. एम. मॅन्युअल यांच्याजागी आय. क्यु. ऐ. सी. व विभाग प्रमुख म्हणून प्रा. संतोष डी. मोहदरे यांची निवड करण्याबाबत-
ठराव क्र. २ प्रा. टी. एम. मॅन्युअल हे आपल्या नियतवयोमाना-नुसार दि. ३१ मे २०२४ ला सेवेतून निवृत्त होत असल्यामुळे IQAC चे पुढील कामकाज पाहण्यासाठी समन्वयक म्हणून अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. संतोष डी. मोहदरे यांच्याकडे हा कार्यभार सोपवावा. असे सभेत सर्वानुमते ठरविण्यात आले.

विषय क्र. ३ आर्थिक वर्ष २०२४-२५ चे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
ठराव क्र. ३ प्रभारी प्राचार्य ढाले यांनी आर्थिक वर्ष २०२४-२५ करीता अनुदानीत तथा विनाअनुदानीत अभ्यासक्रमाचे अंदाजपत्रक सभेत सादर केले. सादर केलेल्या अंदाजपत्रकावर चर्चा होऊन सभेत सर्वानुमते अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली.

विषय क्र. ४ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या रजांना मंजुरी देणे.
ठराव क्र. ४ प्रा. टी. एम. मॅन्युअल, डॉ. एस. आर. कांबळे, ग्रंथपाल यांनी उपभोगलेल्या अर्जित रजांना सेवापुस्तकातील नोंदीनुसार सभेत सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

विषय क्र. ५ संगणक प्रयोगशाळेकरीता संगणक दुरुस्ती, संगणक खरेदी व फर्निचर खरेदीबाबत चर्चा करणे.
ठराव क्र. ५ संगणक प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरीता लागणारे संगणक खरेदी करण्यापेक्षा वेळी येथील

एम. आय. डी. सी परीसरातील कंपनी व तसेच पॉवरग्रीड ला भेटी देऊन CSR (कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबीलीटी फंड) या फंडातून आपल्या महाविद्यालयाला संगणक उपलब्ध करून देऊ शकतात का ? या बाबत विचारणा करणे, तसेच संगणक प्रयोगशाळेतील खराब झालेले फर्निचर दुरुस्त करण्यात यावे असे सभेत सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ६ माननिय अध्यक्षाच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय -

ठराव क्र. ६ माननिय अध्यक्षाच्या परवानगीने येणाऱ्या विषयामध्ये प्रत्येक तीन, तीन महिन्याचा जमा खर्चाचा हिशोब ठेवणे. येणारा पैसा व त्या पैशातून केलेल्या खर्चाचा हिशोब प्रत्येक सभेच्या वेळी सादर करणे असे सर्वानुमते सभेत ठरविण्यात आले.

शेवटी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य यांनी सभेला उपस्थित असलेल्या सर्व सभासदाचे आभार व्यक्त केले, आणि मा. अध्यक्षाच्या अनुमतीने सभा संपली.

Yeshwant Rural Education Society, WARDHA.

[Signature] Principal
S.S N J. Mahavidyalaya
DEOLI, Dist. Wardha